# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ. रंजना रामचंद्र कदम

### मु.पो. इळये, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग



- गिरीपुष्पाची शेताच्या बांधावर लागवड करुन त्याद्वारे हिरवळीचे खताचा वापर.
- हापूस आंब्याचे आधुनिक पध्दतीने उत्पादन व आंबा फळाच्या काढणीपासून विक्रीपर्यंतच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग.
- ‘रंजना उद्योग’ या व्यावसायिक नावाने आंबा उत्पादनाची विक्री.
- काजु प्रक्रियेत उल्लेखनीय कार्य तसेच काथ्या व मसाला प्रक्रिया उद्योग याबाबत महिलांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करुन रोजगार निर्मितीची संधी.
- महिला बचतगटांची स्थापना, विविध कृषि प्रदर्शन, प्रशिक्षण शिबिर व चर्चासत्रामध्ये स्वतः सहभागी होऊन शेतक-यांना मार्गदर्शन.
- सरपंच पदाचे कारकीर्दीत महिलांना संघटीत करुन गावात दारुबंदीची यशस्वी अंमलबजावणी.
- कृषि व संलग्न क्षेत्रातील कार्याबद्दल ‘अहिल्याबाई होळकर‘ पुरस्कार.

१८

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ. सुनंदा प्रभाकर पाटील

### मु.पो. मितावली, ता. चोपडा, जि. जळगाव



१९

- केळी, सिताफळ, लिंबू, आंबा, शेवगा या पिकांमध्ये ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब.
- सेंद्रिय पद्धतीने वांगी, मेथी, कोथिंबीर, गिलकी, कारली, कांदा यासारख्या भाज्यांचे उत्पादन
- परिसरातील उत्तम देशी गायींचे संगोपन करुन आदर्श निर्माण केला व चारा पिकाच्या जयवंत या सुधारीत वाणाची लागवड.
- गावरान गायीचे तुप तयार करुन 'नंदिनी कामधेनू' या ट्रेडमार्कने विक्री.
- शेडनेटमध्ये औषधी वनस्पतीची रोपवाटीका करुन त्याची परिसरातील शेतक-यांना विक्री.
- 'भारतीय महिला' कृषि विज्ञान मंडळाची स्थापना.

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ. शकुंतला जनार्दन संकपाळ

### मु.पो. झरेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर



- सन १९८८ मध्ये प्रथमच एक एकर द्राक्ष बाग लावून टप्प्याटप्प्याने वाढ करून आजमितीस एकूण २३ एकर क्षेत्रावर द्राक्षाची लागवड. माणिकचमण, शरद सिडलेस व थॉमसन सिडलेस या जातींचा समावेश.
- डाळींब पीकात आंतरपीक म्हणुन झेंडूच्या पिकाचे तसेच तैवान ७८६ या पपईच्या सुधारीत जातीचे २००८ साली विक्रमी उत्पादन.
- मल्चिंगचा वापर करुन खरबुज लागवडीत एकरी २० टन इतके उत्पादन.
- शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा अवलंब करुन ट्रॅक्टर चलित फवारणी यंत्र तसेच शेतीसाठी लागणारी विविध यंत्रसामुग्रीची उपलब्धता.
- टिशुकल्चरच्या रोपांची निर्मिती व शेतीस जोडधंदा म्हणुन दुग्धव्यवसाय.
- 'कृषि उत्सव गौरव पुरस्कार' आणि भारतीय समाज विकास अकादमीचा 'सामाजिक' या पुरस्कारांनी सन्मानित.

२०

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ. पुष्पा अमोल कोरडे

### मु. पो. बोरी बु., ता. जुन्नर, जि. पुणे



- शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, पॉलीहाऊसमध्ये गुलाबाचे व इतर उच्च मुल्यांकित पिकांचे उत्पादन.
- "आनंद फ्लोरीटेक ॲण्ड बायोटेक" या नावाने उतीसंवर्धित रोपे तयार करण्याचा प्रकल्प.
- रायपनींग चेंबरची संकल्पना तळापर्यंत पोहोचविण्याचा यशस्वीपणे प्रयोग.
- रायपनींग चेंबरच्या प्रसाराकरीता राष्ट्रीय फलोत्पादन मिशनच्या माध्यमातून केळी व्यावसायिकांच्या चर्चासत्राचे आयोजन.
- सेंद्रिय पध्दतीने गुळ उत्पादीत केला असून त्यास बाजारपेठेत मोठया प्रमाणावर मागणी.
- शेतीला पूरक उद्योग म्हणुन शेततळयामध्ये रोहु, मृगळ, कटला या जातीच्या माशांचे उत्पादन.
- सकाळ समुहाच्या ॲग्रोवनतर्फे देण्यात येणाया 'शारदाबाई पवार जन्मशताब्दी' पुरस्काराकरीता निवड.

२१

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ. साईश्रीया अशोक घाटे

### साईमॉ शुभम अपार्टमेंटस्, बापट मळयासमोर, सांगली



२२

- जमिनधारणा १.१८ हेक्टर असून त्यामध्ये ०.८० हेक्टर द्राक्ष, ०.१० हेक्टर आंबा आणि ०.२० हेक्टर चिकू ही फळपिके.
- माती परीक्षण करुन शिफारशीप्रमाणे रासायनीक खतांबरोबर कंपोस्ट खत, हिरवळीचे खत, गांडूळ खत तसेच जीवाणू खतांचा वापर.
- शेतीमध्ये किफायतशीर पाणी वापरासाठी ठिबक व तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब.
- निर्यातक्षम हळद आणि बेदाणा उत्पादन करून त्यांची विक्री.
- पर्यावरण व निसर्ग रक्षणासाठी “धरणीधरा’ ’ या संस्थेची स्थापना.
- ‘बिझनेस एक्सप्रेस श्री फौंडेशन’ पुरस्काराने सन्मानित.

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ. सरस्वती शिवाजी दाबेकर

### मु.पो. कालिंकानगर, नेकनूर, ता. जि. बीड



२३

- ✡ खडकाळ माळरानावर जेथे कुसळही येत नाही अशा ठिकाणी कष्टातून जिद्दीने फळबागेचे नंदनवन.
- ✡ या खडकाळ जमिनीत केशर, हापुस व मलगोबा अशा विविध वाणांची ११०० कलमे.
- ✡ शेतीमध्ये सेंद्रिय खताचा वापर तसेच एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब.
- ✡ 'सदगुरु बंक्कट स्वामी फळरोपवाटीका' स्थापन करून त्याद्वारे केशर आंबा, चिंच इ. कलमे/रोपे करुन ती परीसरातील शेतक-यांना पुरविण्याचे काम.
- ✡ राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत शेतात शेततळे.
- ✡ शेती व्यवसायाबरोबरच दुग्धव्यवसाय व शेळीपालन तसेच आंब्याचे लोणचे तयार करुन विक्री करण्याचा गृह उद्योग.

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ. अनुपमा भारत कुलकर्णी

### श्री तुळजाभवानी साखर कारखान्यासमोर, स.नं.२४१, नळदुर्ग, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद



- एम.ए.(इंग्रजी) पर्यत शिक्षण, इंग्रजीचे प्राध्यापकाची नोकरी सोडून सन २००७ पासून पुर्णवेळ शेती व्यवसाय.
- शेतातून वाहत असलेल्या नाल्यावर बंधारे बांधून जागोजागी पाणी अडवल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी वाढून सिंचनाची सुविधा.
- 'राष्ट्रीय फलोत्पादन अभियान' अंतर्गत ५०० आंब्याची व १५०० डाळींबाची लागवड.
- पाण्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी ८० हजार लिटर क्षमतेचा हौद बांधून ठिबक सिंचन तसेच तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब.
- स्त्रीभ्रूण हत्येविरुध्द जागृति तसेच अंधश्रध्दा निर्मुलन यावर व्याख्यान देऊन जनजागृतीचे कार्य.
- महाराष्ट्र कृषक समाज व सावित्रीबाई फुले सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्रांतीज्योती' पुरस्कार तसेच 'आदर्श शेतकरी' पुरस्काराने सन्मानित.

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## श्रीमती. निता राजेंद्र सावदे

### मु. कणी मिर्जापूर, पो. वेणी गणेशपूर, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती



२५

- शेतामध्ये खड्डे करुन त्यात काडी-कचरा भरुन कंपोस्ट खत तयार करुन शेतीमध्ये वापर.
- शेताजवळून वाहणा-या नाल्यावर वनराई बंधारे लोकसहभागातून बांधल्याने भूगर्भातील पाण्यातील पातळी वाढण्यास मदत.
- सेंद्रिय खतावर घेतलेला कांदा साठवून त्यांना आलेल्या कोंबाच्या कांद्याची लागवड करुन बिजोत्पादन.
- भविष्यात पुर्ण शेती सेंद्रिय करण्याचा त्यांचा मानस.
- महिला सक्षमीकरणासाठी गृह उद्योग व सेंद्रिय शेतीविषयक प्रशिक्षण देण्याचे कार्य.
- गट ग्रामपंचायतीची स्थापना झाल्यापासून प्रथम महिला सरपंच होण्याचा मान.

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ.वंदना पंडीतराव सवाई

### मु. पो. उत्तमसरा, ता. भातकुली, जि.अमरावती



२६

- आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये अवलंब तसेच गांडूळ खत प्रकल्प राबवून उत्पादीत खताचा स्वत:च्या शेतात वापर.
- जिल्हयाच्या ठिकाणी होत असलेल्या कृषि प्रदर्शनीमध्ये सहभागी होऊन उत्पादीत मालाची विक्री.
- सोयाबीनवर प्रक्रिया करुन सोयामिल्क व त्याचे पदार्थ बनवून अंगणवाडीत कुपोषित बालकांना आहारामध्ये देणे.
- गृहोद्योगाबाबत प्रशिक्षण घेतले असून महिलांना शेवया, पापड, कुरडई इत्यादी उद्योगांची माहिती देऊन रोजगाराचे साधन उपलब्ध करुन दिले.
- गावातील व परिसरातील महिलांना एकत्रित करुन बचतगटाची स्थापना व महिला बचतगटामार्फत शेतीकरीता कमी व्याजदरात कर्जपुरवठा.
- बालसंस्कार शिबीर, युवक-युवतींकरीता तसेच वृध्दांकरीता योग व प्राणायाम शिबीराचे आयोजन.
- ‘स्व. राजीव गांधी कृषिरत्न व कुशल उद्योजक’ पुरस्काराने सन्मानित.

# जिजामाता कृषिभूषण २०१२

## सौ.मालतीबाई मधुकर कुथे

## मु.पो. गांगलवाडी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर



- आंबा, संत्रा यासारखी फळपीके, तसेच भात, भाजीपाल्याची पीके, शेताच्या बांधावर बांबू व निलगिरी या झाडांची लागवड.
- भातपीकाची लागवड श्री पध्दतीने केल्यामुळे भरघोस उत्पादन.
- जिप्समचा वापर करुन नापीक जमिन लागवडीखाली.
- शेतीमध्ये यांत्रिकीकरण केले असून यामध्ये ट्रॅक्टर व बहुपिक मळणी यंत्र बँकेमार्फत खरेदी.
- बायोगॅस संयंत्राचा वापर करुन अपारंपारीक उर्जेचा वापर.
- सरपंचपदी कार्यरत असताना गावातील दारुची दुकाने बंद करण्याकरीता आमरण उपोषण.
- कृषि क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हास्तरीय' शेतीनिष्ठ पुरस्कार' आणि आखिल भारतीय कुणबी समाज संघटना यांच्या 'शेतीनिष्ठ पुरस्कार' ने गौरवित.

२७